# तोडपाणीसाठी आ.संदीप क्षीरसागरांनी कामे रोखली, तीन अधिकारी घरगड्यासारखं वागतात, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन..!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २६१ ■ सोमवार दि.९ जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 261 ■ Monday Dt.9 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4





# कोट्यवधी रुपयांची टक्केवारी घेऊन आ.संदीप क्षीरसागर कामे अडवत असल्याचा थेट आरोप?

## ग्रामीण रस्त्याची कामे सुरु करण्यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

## आ.संदीप क्षीरसागरांच्या दबावतंत्रामुळे बीड तालुक्यात रस्त्याची कामे रखडल्याचा आरोप

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ग्रामीण भागातील नाळवंडी, पालीसह इतर जिल्हा परिषद गटातील ग्रामीण रस्त्यांची कामे आ.संदीप क्षीरसागर यांनी अडविल्याचा आरोप करत अनेक गावचे सरपंच, पदाधिकाऱ्यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारी (दि.९) सकाळी ११ वाजता लक्षवेधी धरणे आंदोलन सुरू केले आहे.

हे आंदोलन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, नाळवंडीचे सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, भाजपचे जिल्हा सचिव शांतीनाथ डोरले यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, माजी नगरसेवक अमर नाईकवाडे, युवा नेते महेश धांडे, भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ.लक्ष्मण जाधव, महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष ड.सतीश शिंदे, भाऊसाहेब डावकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवकचे बीड तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे, पंचायत समितीचे माजी सदस्य उत्तरेश्वर सोनवणे, युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, अरुण लांडे, प्रदीप




गायकवाड, सरपंच धनेश्वर खेत्रे, दत्ता जाधव, रोहित जाधव, सिद्धार्थ जाधव, राजाभाऊ नवले, लकी कंडेरे, राजू टाक, सुमंत राऊत, नामदेव म्हेत्रे, सखाराम राऊत, सचिन उनवणे यांच्यासह अनेकजण सहभागी झाले होते.

ॲड.राजेंद्र राऊत यांनी म्हटले की, आ.संदीप क्षीरसागर यांच्या दबावतंत्रामुळे अधिकारी रस्त्याचे मार्कआऊट देत नसून रस्त्याचे काम रखडले आहे. त्यामुळे आमदारांसह अधिकाऱ्यांचा निषेध करण्यासाठी आंदोलन करत असल्याचे सांगितले. बीड तालुक्यातील नाळवंडी, पालीसह इतर जिल्हा परिषद गटातील नाळवंडी ते मौज व्ही.आर.क्र. २४३ काळेगाव हवेली ते लमाण तांडा रस्ता व्ही.आर. ३५४, ओडीआर ५० ते मानकुरवाडी रस्ता व्ही.आर. ३७, पाली ते वरवटी इजिमा १२७, पाली ते वरवटी इजिमा १२७ यांसह इतर अनेक रस्ते सुधारणा अंतर्गत कामे आहेत. सदर रस्ते हे जिल्हा नियोजनमधून सन २०२४ या वर्षामध्ये मंजूर आहेत. सदर रस्त्याचे कार्यारंभ आदेश ६ महिन्यांपूर्वी झालेले आहेत. या रस्त्याचे काम सन २०२४ मध्ये जिल्हा नियोजन समितीमार्फत मंजूर झाले असून, डिसेंबर २०२४ मध्ये कामाचे कार्यारंभ आदेश निघाले आहेत. मात्र, बीडमधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता, उपअभियंत्यांकडून अद्यापही कामाचे मार्कआऊट देण्यात आलेले नाहीत. आ.संदीप क्षीरसागर यांना ज्या भागातून अल्प मतदान झाले, त्या त्या भागातील कामे थांबवण्यात येत असल्याचा आरोप सरपंच ड.राऊत यांनी केला आहे. यापूर्वीही त्यांनी अनेक विकासकामात खोडा घातला, परंतु यापुढे त्यांची मनमानी सहन केली जाणार नाही, त्यांच्याविरोधात वेळोवेळी आवाज उठविला जाईल, असा इशाराही ॲड.राऊत यांनी दिला आहे. दरम्यान, मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना देण्यात आले. यावेळी बीड तालुक्यातील अनेक गावचे सरपंच, पदाधिकारी, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### प्रशासनाच्या भूमिकेचा निषेध

वारंवार पत्रव्यवहार करूनही प्रशासनाकडून या प्रकरणाची दखल घेतली जात नाही. त्यामुळेच आम्हाला रस्त्यावर उतरावे लागले, असे सांगत आंदोलकांनी प्रशासनाच्या भूमिकेचा तीव्र निषेध व्यक्त केला. धरणे आंदोलनादरम्यान घोषणाबाजी करत ग्रामस्थांनी रोष व्यक्त केला.

### रास्ता रोकोचा इशारा कायम

आजच्या आंदोलनातूनही प्रशासनाने सकारात्मक पावले उचलली नाहीत, तर सोमवार, १६ जून रोजी जरुड फाटा येथे रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही सरपंच ड.राजेंद्र राऊत यांनी दिला आहे. जबाबदार अधिकारी घटनास्थळी उपस्थित राहेपर्यंत रास्ता रोको मागे घेतला जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### काम रखडल्याने ग्रामस्थ हैराण

सदरील रस्ता रहदारीचा असून, काम रखडल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तत्काळ मार्कआऊट करून काम सुरू करण्यात यावे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. या आंदोलनाची प्रत पालकमंत्री ना.अजित पवार, जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, पोलीस प्रशासन यांना देण्यात आली आहे.

## गोळेगाव येथे अवैद्यरित्या वाळूने भरलेला ट्रॅक्टर पकडला

बीड । प्रतिनिधी

आज दिनांक ०९/०६/२०२५ रोजी रात्री ०१.०० वाजता चे सुमारास रात्रगस्त पेट्रोलिंग करत असताना पोलीस नाईक मोहसीन शेख यांना गोपनीय बातमीदार यांच्याकडून माहिती मिळाली की, मौजे गोळेगाव येथे अवैद्य रित्या वाळू ट्रॅक्टर मध्ये भरून जात असल्याची माहिती मिळाल्यावरून सदर ठिकाणी जाऊन ट्रॅक्टरचा पाठलाग करून वाळू भरलेल्या ट्रॅक्टर गोळेगाव शेत शिवारात पकडला. सदर वाळूने भरलेल्या ट्रॅक्टर पोलीस ठाणे तलवाडा येथे आणून पोलीस नाईक मोहसीन शेख यांनी सरकार तर्फे फिर्याद दिली आहे. सदर वाळूने भरलेला ट्रॅक्टर एकूण ५,०५,०००/ पाच लाख पाच हजार रुपये मुद्देमाल करण्यात जप्त करण्यात आला आहे. तसेच पुढील तपास तलवाडा पोलीस पोह/४०२ मस्के करीत आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पंडकर सा.,पोलीस उप अधीक्षक मीना साहेब, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक मोहसीन शेख व अमोल औसरमल यांनी केली.

## शिरूर कासार नगरपरिषदेचा कचरा शेतकऱ्यांचा शेताजवळ उघड्यावर

### शिरुर कासार नगरपरिषदेचा भोंगळ कारभार

शिरूर कासार । प्रतिनिधी

शिरूर कासार येथील नगरपरिषद अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मौजे बावी (ब्रम्हनाथ येळंब) तालुका शिरूर कासार जिल्हा बीड येथे गेल्या सहा वर्षापूर्वी राबविण्यात आला असता, यामध्ये घनकचऱ्यापासून कंपोस्ट खत निर्मिती करणे असा प्रकल्प आहे परंतु या प्रकल्पाचा कुठलाही सकारात्मक उद्देश संपूर्ण झालेला दिसत नाही. नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ढाकणे साहेब यांना वारंवार विचारणा केली असता उडवाउडवी चे उत्तर या ठिकाणी गावकऱ्यांना देण्यात आलेले आहेत. यासंदर्भात वारंवार नगर परिषदेची पत्रव्यवहारही करण्यात

▶ पान २ वर






## नेकनुर येथे ४०९ घरकुलांना मंजूरी

नेकनुर । प्रतिनिधी

सन २०१८–१९ मध्ये घरकुलासाठी अर्ज दाखल करण्यात आले होते गेल्या सात वर्षांपासून घरकुलासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करुन आज हे ४०९ घरकुल मंजूर झाले असून यातील १७ जणांच्या खात्यावर पैसे जमा झाले असून उर्वरित ३९२ जणांच्या खात्यावर पैसे जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे घरकुल मंजूरीसाठी गेल्या ७ वर्षांपासून प्रयत्न करणारे ग्राम पंचायत सदस्य सय साजेद अली उर्फ बाबु तभाई, ईजहारोद्दीन जहागीरदार, सय्यद खालेद पत्रकार यांचे यश असुन मंजूर झालेल्या सर्व घरकुलधारका कडुन त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

घरकुलाची यादी बोगस आहे म्हणून गावातील सर्व पक्षीय गटाच्या माध्यमातून एकत्र आलेल्या काही विघ्नसंतोषी मंडळीनी ग्रामपंचायत कार्यालय समोर उपोषण करुन घरकुलधारका मध्ये संभ्रम निर्माण केला होता.तर एक माजी पं.स.सदस्य एक माजी काही ग्रामपंचायत सदस्य यांना ही बाहेरुन खतपाणी घालत होते. आज त्यांचे हसु झाले आहे आणि आज त्यातीलच काही मंडळी आज हेच घरकुलधारकाकडे लुडबुड करीत आहे. जे लुडबुड करीत आहेत त्यांचे सुध्दा नाव त्या यादी मध्ये आहे त्यांची शरमेनी मान खाली गेली आहे असे त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

**घरकुल मंजूर झाले तर राजकारण सोडून देईल**

इतके घरकुल अल्पसंख्याक समाजातील लोकांना मंजूर झाले तर राजकारण सोडून देईल अशी भपकी पुर्वी शिवसंग्राम मध्ये असलेला त्यातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश करुन अल्पसंख्याक आघाडी च्या प्रदेश उपाध्यक्ष असलेल्या व माजी पं.स सदस्य नी सार्वजनिक ठिकाणी घरकुल धारकासमोर केली होती आता हे घरकुल मंजूर झाले आहे. यातील १७ जणांच्या खात्यावर पैसे जमा झाले आहे तर उर्वरित ३९२ लाभार्थ्यांची पैसे जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.आता हा तथाकथित नेत्यानी राजकारणातुन संन्यास घ्यावा किंवा सार्वजनिक ठिकाणी येऊन समाजाची माफी मागावी या नंतर नेकनुर च्या विकास कामांमध्ये लुडबुड करू नये अशी मागणी सर्व घरकुल धारक कडून होत आहे.

## स्व. आर.टी. जिजा संयम आणि निष्ठेचे प्रतिक होते

### गंगापूजन कार्यक्रमात ना. पंकजाताई मुंडे यांनी दिला आर.टी. देशमुख यांच्या आठवणींना उजाळा




परळी वैजनाथ । प्रतिनिधी

माजी आमदार आर.टी. देशमुख यांच्या गोडजेवण कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी उपस्थित राहून आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमात त्यांनी देशमुख यांच्या स्मृतींना उजाळा देताना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या, संयम, निष्ठा, प्रेम आणि जिव्हाळा म्हणजेच आर.टी. देशमुख जिजा होते. त्यांच्या अचानक निधनाने मला मोठा धक्का बसला. ते केवळ राजकीय सहकारी नव्हते, तर माझ्यासाठी एक भावनिक आधार होते. मी अनेक वेळा अडचणीत असताना त्यांनी मार्गदर्शन केलं. त्यांच्या चेहऱ्यावर कधीही चिंता दिसली नाही. अत्यंत शांत, संयमी आणि आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व आज आपल्यात नाही, ही खूप मोठी पोकळी आहे.

यानिमित्त हभप यशवंत महाराज पाटील यांचे कीर्तन झाले. त्यांनी 'कर्तव्यनिष्ठ जीवनाची प्रेरणा' या विषयावर भावस्पर्शी कीर्तन सादर केलं. कीर्तन श्रवण करताना पंकजाताईंच्या डोळ्यांत अश्रू तरळले. कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, ग्रामस्थ व देशमुख यांचे हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुण्यभूमी श्रीक्षेत्र चाकरवाडीत स्वर्ग अवतरला : लक्ष्मण महाराज मेंगडे

## संत ज्ञानेश्वर दादा माऊली यांच्या पुण्यतिथी उत्सवात पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्प संपन्न

चाकरवाडी । प्रतिनिधी

संत ज्ञानेश्वर दादा माऊली यांच्या पुण्यतिथी उत्सवात पुण्यभूमी श्रीक्षेत्र चाकरवाडीत स्वर्ग अवतरला आहे असे प्रतिपादन महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले. रोप्य महोत्सवी पुण्यतिथी उत्सवात पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुंपताना ते बोलत होते.. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर, श्री ह भ प नारायण भाऊ महाराज उत्तरेश्वर पिंपरी, श्री ह भ प राम महाराज काजळे, श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश महाराज जाधव, आदर्श पोलीस पाटील नानासाहेब काकडे, तानाजी आबा कदम, यांच्यासह हजारो भावी भक्तांचे उपस्थिती होती..

बीडच्या श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत विभुती संत ज्ञानेश्वर दादा माऊली यांच्या रोप्य महोत्सवी पुण्यतिथी उत्सवात पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी समर्पित केले.. यावेळी त्यांनी संत तुकाराम महाराज यांच्या

समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।<br>
तेथें माझी हरी वृत्ति राहो ।।१।।<br>
आणीक न लगे मायिक पदार्थ ।<br>
तेथें माझें आर्त्त नको देवा ।।ध्रु.।।<br>
ब्रम्हादिक पदें दुःखाची शिराणी ।<br>
तेथें दुश्चिंत झणी जडों देसी ।।२।।<br>
तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म ।<br>
जे जे कर्मधर्म नाशवंत ।।३।।



या अभंगावर चिंतन मांडले पुढे बोलताना महाराज म्हणाले..रौप्य महोत्सवी पुण्यतिथी उत्सवात इंद्राला लाजवेल अशी व्यवस्था केली. स्वर्ग आम्ही पाहिलेला नाही. मात्र आज श्रीक्षेत्र चाकरवाडीत साक्षात स्वर्ग अवतरला आहे. या ज्ञानगंगा मध्ये नाहून निघण्याच्या संताच्या आशीर्वादातून परम भाग्य मिळाले..

हा अभंग सूत्रात्मक आहे. सूत्र छोटे असते मात्र यामध्ये खूप मोठा गहन अर्थ दडलेला असतो..वेदाची महावाक्य छोटी आहे. त्यात आध्यात्मिक हित दडलेले आहे.माणसाच्या आदर्श जीवनाची सूत्र संत साहित्यात आहे. काहीवेळा काम शिल्लक राहते आयुष्य संपते, तर काहीवेळा काम संपून जाते आयुष्य शिल्लक राहते.. संत नामदेव महाराज यांनी अभंग रचनेची प्रार्थना केली. पण आयुष्य संपले. म्हणून पुन्हा जगतगुरु तुका अवतार नामयाचा..तुकाराम महाराज पुन्हा अभंग रचना करताना पहिला अभंगहा लिहिला या अभंगात मंगल केलेले. मंगलाचे विविध प्रकार आहेत यामध्ये आशीर्वादात्मक वस्तू निर्देशनात्मक आणि नमस्कारात्मक या अभंगात वस्तू निर्देशनात्मक आणि आशीर्वादात्मक मंगल आहे..वारकरी संप्रदायाने जातीयता निर्मूलन करण्याचे काम जोग महाराज यांनी केले.माऊली दादाच्या चरणी प्रार्थना हा जातीवाद संपवा पुन्हा सामाजिक घडी बसावी ही मागणी. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केली..

विठेवरील पांडुरंगाची दृष्टी सम आहे.संतांची दृष्टी सम असते.आता दया ते येसी पूर्ण चंद्रिका जैसी अस साजरे आणि सुन्दर चरण विठेवर आहे.. भोगाच्या अनुकूलते मध्ये समाधान नाही तर वृत्तीच्या स्थिरतेवर समाधान अवलंबून आहे.वृत्ती देवाच्या नाम स्मरणाने स्थिर होते.जगाच्या पाठीवर देवा व्यतिरिक्त सर्व मायिक पदार्थ आहेत. त्याचे वर्म आम्हाला कळले आहे असे महाराजानी चिंतन मांडले.

यावेळी साथ संगत माऊली महाराज आवटे, संजय महाराज देवकर, बिबीशन महाराज कोकाटे, मुरकुटे महाराज, हरिभाऊ महाराज काळे , सतीश महाराज जाधव, आदित्य महाराज पवार, यांच्यासह शेकडो टाळकरी मंडळी गुणीजन मंडळी उपस्थित होती.

# लढवय्या कृतिशील शिक्षणतज्ञ प्राचार्य डॉ. खुशाल मुंढे



जगामध्ये काहीच लोक असतात ते वेगवेगळ्या स्तरावर त्यांच्या कार्य कुशलतेच्या माध्यमातून एक ठसा उमटावत असतात तसंच एक व्यक्तिमत्व या महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सामाजिक राजकीय पटलावर आपला आपल्या लढवय्या कृतिशील आणि परिवर्तनवादी स्वभावातून वागण्यातून बोलण्यातून आणि कृतीतून सर्वांचे लक्ष केंद्रित करून नेहमी आठवणीत व्यक्तिमत्व म्हणजे शिक्षणतज्ञ आणि शैक्षणिक सामाजिक राजकीय चळवळीचे अभ्यासक प्राचार्य डॉ खुशाल लिंबराज मुंढे हे होत

सरांविषयी लिहीत असताना सुरुवात कुठून करावी हा प्रश्न माझ्यासमोर उभा राहतो कारण या व्यक्तिमत्वाला गेल्या २५ वर्षापासून मी ओळखतोय हे व्यक्तिमत्व स्वाभिमानी कोणासमोरही लाचार न होणार सत्यवादी विचाराचं गरजवंतांना नेहमी साथ देणार जात धर्म पंथ यापलीकडे जाऊन प्रत्येकाला आपलंसं करणार तेही आपल्या कृतीतून आपल्या वागण्यातून सरांचा जन्म बालाघाट डोंगर रांगेतील चुंब तालुका बार्शी जिल्हा सोलापूर या ठिकाणी एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात झाला आई स्वर्गीय आणि वडील स्वर्गीय लिंबराज उर्फ अण्णासाहेब यांच्या पोटी जन्मलेला हा हिरा आपलं प्राथमिक शिक्षण गावातल्या जिल्हा परिषद शाळेमध्ये पूर्ण करून बार्शीसारख्या तालुक्याच्या बार्शी टेक्निकल हायस्कूल या ठिकाणी माध्यमिक तर श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय या ठिकाणी उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केलं आणि हे शिक्षण पूर्ण करत असताना सरांचे चुलते ज्याला डोंगरी वाघ म्हणून सर्वसामान्य लोकांनी पदवी दिली असे लोकनेते कृषी उत्पन्न बाजार समितीचे तत्कालीन सभापती स्वर्गीय भीमराव मुंढे हे बार्शी तालुक्यातील आगळगाव परिसरात बार्शी तालुक्यात आणि सोलापूर जिल्ह्यात राजकारण समाज करणार सक्रिय होते त्यांच्या सातत्याच्या जवळीकते मुळे त्यांचा ग्रामीण भागातील जनतेशी असलेला दांडगा जनसंपर्क त्यांची जोडलेली नाळ हे सरांना जवळून पाहता आलं अनुभवता आलं.

त्यामुळे एका बाजूला शिक्षण घेण्याची ओढ दुसऱ्या बाजूला समाजकारणाची ओढ राजकारणाकडे असणारी ओढ या तिन्ही मधून ज्या गोष्टीला प्राधान्य द्यायला हवं त्या गोष्टीला प्राधान्य देण्यासाठी मोठे बंधू सेवानिवृत्त पोलीस अधिकारी रमेश राव एडवोकेट माणिकराव फिजिकल डायरेक्टर बाळासाहेब आणि व्यापारी वृत्ती जागृत करणारे अर्जुनराव पंडितराव या सर्वांच्या प्रेरणेतून सरांनी पुढे डॉक्टर होण्याचं ठरवलं परंतु त्यांना बारावी मध्ये म्हणावं तेवढं यश संपादन करता आलं नाही त्यामुळे पारंपारिक शिक्षण घेऊन मी कोणत्या ना कोणत्या विषयात डॉक्टरेट मिळविण्याची खूणगाट मनाशी बांधली त्या दृष्टिकोनातून औरंगाबाद येथील शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलं.

# पंचशील नगर मधील लाईट सोबत लाईनमन गायब : अमोल लोखंडे

बीड । प्रतिनिधी

बीड शहराला पाण्याचा दुष्काळ हा काही नवीन नाही परंतू आता नळाला पाणी आले तर लाईट नसती अशी काहीशी परिस्थिती पंचशील नगर परिसरात झाली आहे. १० ते १५ दिवसाला नागरीकांच्या नळाला पाणी येते त्यातून लाईट नसल्यामुळे येथील रहिवाशांची तारांबळ उडाल्याचे पहावयास मिळत आहे.

मे महिन्यात नळाला तब्बल ३४ दिवसानंतर पाणी आले. या पाण्यासाठी अनेक युवकांनी आंदोलन देखील केले होते. मान्सून पुर्वीच मराठवाड्यात चांगला पाऊस झाल्यामुळे नागरीकांमध्ये समाधान व्यक्त केले जात होते. आता तरी पाण्याची समस्या होणार नाही म्हणून परंतू आता नळाला १० दिवसाला का होईना पाणी येते परंतू पाणी भरण्यासाठी लाईट उपलब्ध होत नाही. नागरीकांनी करावे तर काय करावे अशी संतप्त भावना पंचशील नगर परिसरात उमटू लागली आहे.

**लाईनमन नॉट रिचेबल**

नळाला पाणी येवून देखील पंचशील नगरमधील नागरीक हे पाणी भरू शकत नाहीत. एक तर १० ते १५ दिवसाला पाणी आल्यामुळे नळाला प्रेशर कमी प्रमाणात असते त्यातून लाईट गेली तर मग बोंबाबोंब अशा परिस्थितीत पंचशील नगरमधील लाईनमन विशाल गायकवाड यांना कॉल केला असता एक तर ते नॉट रिचेबल असतात किंवा कॉल स्विकारत नाहीत.



# लहुजी शक्ती सेना युवक आघाडी नविन पदनियुक्त्या

बीड । प्रतिनिधी

लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री.विष्णूभाऊ कसबे साहेब व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा.श्री.कैलास दादा खंदारे साहेब तसेच महाराष्ट्र प्रदेश महासचिव मा.श्री.बालाजीभाऊ गायकवाड व युवक प्रदेशाध्यक्ष सचिन भैय्या क्षीरसागर यांच्या आदेशाने, तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य विलास भाऊ मोमीन यांच्या मार्गदर्शनाखाली आज बीड शासकीय विश्रामगृह येथे लहुजी शक्ती सेनेच्या युवक पदाधिकाऱ्यांच्या काही निवडी कारण्यात आल्या.

या वेळी लहुजी शक्ती सेनेचे मराठवाडा युवक अध्यक्ष विजय चांदणे यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास रमेश थोरात सर यांनी उपस्थितांना संघटनेबद्दल माहिती दिली व मार्गदर्शन केले कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आकाशभैय्या घोरपडे उपस्थित होते.

लहुजी शक्ती सेनेचे युवक नवनिर्वाचित पदाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत.

लहुजी शक्ती सेनेच्या मराठवाडा युवक संघटकपदी विनोदभाऊ थोरात, तसेच बीड जिल्हा युवक उपाध्यक्षपदी शैलेश दोडके,बीड शहर युवक अध्यक्षपदी दिपक आव्हाड, बीड तालुका युवक सचिवपदी ओमकार शिंदे बीड तालुका सोशल मीडिया अध्यक्षपदी व बीड शहर सोशल मीडिया अध्यक्षपदी सामधान कानाडे यांच्या निवडी करण्यात आल्या आहेत.

# शिक्षक मोहन झगडे 'सर' यांना राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक लोकरत्न' पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सोलेवाडी गावाचे सुपुत्र व ब्रह्मगाव येथील श्रृंगेरी विद्यालयाचे सहशिक्षक श्री.झगडे मोहन महादेव यांना त्यांच्या समाजोपयोगी कार्याबद्दल राज्यस्तरीय आदर्श शिक्षक 'लोकरत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. हा राज्यस्तरीय पुरस्कार संभाजीनगर येथील संत एकनाथ रंगमंदिरात वितरित करण्यात येणार असून,माननीय राजस्थानचे महामहीम राज्यपाल श्री हरिभाऊ नाना बागडे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होईल.मोहन झगडे सरांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य:बी ए एसी.,बी.एड.शिक्षण घेतलेले झगडे सर सध्या शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्रृंगेरी विद्यालय, ब्रह्मगाव येथे कार्यरत असून,मागील १७ वर्षांपासून ते विनामोबदला सेवा केली.आणि आता वेतन चालू आहे.

स्वच्छता,वेळेचे महत्त्व, शिस्त आणि बंधुता या मूल्यांचा प्रचार-प्रसार ते शाळकरी विद्यार्थ्यांत सातत्याने करत आहेत.त्यांच्या कार्यामध्ये खालील बाबी विशेष उल्लेखनीय ठरतात: सिंधुताई सपकाळ बचत गटामार्फत अनाथ व गरजूंसाठी दरमहा आर्थिक मदत गरजू विद्यार्थ्यांना मोफत शिकवणी व बससुविधा सामाजिक,आध्यात्मिक व



आरोग्य क्षेत्रात सातत्याने कार्यरत व्यसनमुक्ती व पर्यावरणस्नेही उपक्रमांचे आयोजन कोरोनाकाळात गरजूंसाठी जीवनावश्यक मदत विद्यार्थ्यांची फी भरून प्रवेश मिळवून देणे कविता, भावगीत लेखन व सादरीकरण गावविकासाच्या कामांमध्ये सक्रीय सहभाग पुरस्कार सोहळ्याला मान्यवरांची उपस्थिती: राजस्थानचे माननीय महामहीम राज्यपाल श्री.हरिभाऊ बागडे यांच्यासोबत सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ,कॅबिनेट मंत्री अतुल सावे, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, पालकमंत्री खासदार संदीपान भुमरे, माजी खासदार इम्तियाज जलील, आमदार प्रदीप जैस्वाल, संदीप क्षीरसागर, प्रशांत बंब तसेच राष्ट्रसंत रामगिरीजी महाराज आणि मराठवाड्यातील अनेक मान्यवर आय ए एस/ आय पी एस अधिकाऱ्यांची उपस्थिती असणार आहे.

पुरस्कार प्रदान करताना लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्याचे बी.बी.वैद्य, प्रदेश सहसचिव सुनील महाकुंडे, उपाध्यक्ष अनीस कुरेशी, बीड जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब साबळे आदी मान्यवर उपस्थित राहतील. समाजात नवा आदर्श:श्री.झगडे सरांचे कार्य समाजात नवा प्रकाश पसरवणारे असून, त्यांच्या या कार्याची दखल घेत राज्यस्तरीय पुरस्काराने त्यांचा गौरव होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल सोलेवाडी,बावी ग्रामस्थांच्या वतीने आणि पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय आष्टी, आजी माजी सैनिक त्रिदल संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात आले. तसेच आजी-माजी आमदार, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, नातेवाईक, मित्र परिवार व सर्व क्षेत्रातील मान्यवरांकडून सोशल मीडियावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पान १ वरून...

## शिरूर कासार नगरपरिषदेचा कचरा...

आलेला आहे. रस्त्यावर कचरा टाकला जातो. यामुळे बावी गावातील ग्रामस्थ तथा प्राणीमात्रांवर अतिशय दुर्गंधीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

लवकरात लवकर या कचऱ्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावण्यात यावी अन्यथा सर्व बावी ग्रामस्थ जिल्हाध्यक्ष कार्यालय समोर आम्ही सर्वजन तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा उद्धव मारुती खरमाटे,भीमराव विश्वनाथ खरमाटे, रवी नामदेव ढाकणे, बाळू महादेव मोरे, अशोक कोंडीबा मोरे, संभाजी नवनाथ खरमाटे, चांगदेव ढाकणे, अनिल प्रभाकर ढाकणे, भानुदास मोरे, सचिन शामराव मोरे, संतोष मुरलीधर मोरे, त्याच बरोबर सर्व गावकऱ्यांनी दिलेला आहे.

# वटसावित्री पौर्णिमा : सांस्कृतिक अनुबंध, सामाजिक अनुबंध, पर्यावरण अनुबंध

काकू आवरा लवकर.. मुहुर्त निघून जाईल... हो आले, जरा यांचे ताट वाढून ठेवते..., काय ग! आज छान तयार झालीस... हो ना, आज पूजेला जायचे होते ना, म्हणून आज स्वयंपाक नाही केला स्वतः च छान तयार झालेत... रोज कुठे आपल्याला वेळ असतो आज निमित्त... तू ग... पूजेचे सर्व साहित्य घेतलेस ना... हो काकू, पण आंबे तेवढे घ्यायचे राहिलेत, असू दे... जातांना घेऊ... चला चला लवकर मुहूर्त टळायच्या अगोदर जायला हवे... हे शब्द आज गल्लीबोळातून, कॉलनीमधून कानावर पडत असतील. कारण आज सर्वच स्त्रियांचा आवडता सण आहे. नव्या नवरीपासून ते आपल्या आज्जीपर्यंत सर्वच या दिवसाची वाट पाहत असतात. कारण हा सण म्हणजे आपल्याला आयुष्यभर साथ देणाऱ्या पतीला खुश करण्याचा सण असतो, असा स्त्रियांचा समज आहे. समजच आहे असे नाहीतर वर्षानुवर्षे चालत आलेली ही एक कौटुंबिक परंपरा आहे. वटसावित्री पौर्णिमा हा सण साजरा करण्यामागचा उद्देश काय असावा? यामागील सांस्कृतिक अनुबंध, सामाजिक अनुबंध, पर्यावरण व वैज्ञानिक दृष्टिकोन काय असेल? असा विचार मनाला स्पर्श करून गेला आणि या प्रश्नांचे उत्तर उलगडत गेले.

*सांस्कृतिक अनुबंध: भारतीय संस्कृतीला हजारो वर्षांपूर्वीचा इतिहास आहे. भारतीय संस्कृतीनुसार निसर्गामध्ये ईश्वर वसतो आणि म्हणूनच हजारो वर्षापासून कोणत्या ना कोणत्या सणांच्या निमित्ताने येथील निसर्गाची पूजा केली जाते. ऋषी पंचमीला खड्यांची पूजा, नागाची पूजा, समुद्राची पूजा, दगड, माती, पाणी, झाड, प्राणी या सगळ्यांची पूजा करण्याची आणि त्याद्वारे ईश्वराच्या अफाट सृष्टीशी तादात्म्य साधण्याची आपली परंपरा असून या सगळ्यांना सामावून घेणारी एक विशिष्ट निसर्गाला अनुकूल अशी संस्कृती भारतात विकसित झालेले आहे. निसर्गाला डावलून मानव जिवंत राहू शकत नाही, म्हणूनच आजच्या वैज्ञानिक काळातही या ना त्या कारणाने आपण निसर्गाची पूजा करतो. पूजा करतो म्हणजे काय? तर त्याच्याजवळ जाणे, निसर्गाच्या सहवासात राहणे, संवर्धन करणे, काळजी घेणे, आपण निसर्गाची काळजी घेतली तर तो आपली काळजी घेईल. म्हणूनच, या दिवशी भारतीय संस्कृती प्रमाणे विशाल, अक्षय, आधारवड अशा वटवृक्षाची आज स्त्रिया पूजा करतात. वडच का? हा प्रश्न मनात नक्की येतो, यासाठी पौराणिक एक आख्यायिका सांगितलेली आहे. ज्यामध्ये अनेक वर्षांपूर्वी भद्र देशांमध्ये अश्वपती नावाचा राजा होता आणि त्याला सावित्री नावाची कन्या होती. राजाने सावित्रीला पती निवडण्याचे स्वातंत्र्य दिलेले होते. सावित्रीने सत्यवान या युवकाची निवड केली. यांचे वडील अंध होते त्यांचे नाव ध्रुम्त्सेन असून ध्रुम्त्सेन राजा हा राज्य हरलेला राजा होता.तो मुलाबाळांसह जंगलात राहत असत.अर्थातच सत्यवान हा जंगलात राहत होता. एके दिवशी जंगलामध्ये काम करत असताना सत्यवान एका झाडाखाली मूर्च्छित पडला आणि ते झाड होते वडाचे. तेथे यमदेव आलेले होते. सावित्रीने यमदेवाला याचना केली, पतीबरोबर जाण्याची परवानगी मागितली. सावित्रीच्या या हट्टा पायी यमदेवाने सत्यवानाचे प्राण परत दिले. मूर्च्छित सत्यवान जिवंत झाला. अशी ही आख्यायिका आहे. या आख्यायिकेमुळे का होईना स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करतात आणि त्याचे महत्त्व समजून घेतात. पूजा करण्यासाठी का होईना गावागावात वडाचे झाड लावले जाते व त्याचे संवर्धन केल्या जाते. खरं तर या आख्यायिकेचा खोलवर विचार केला तर वडाच्या झाडाचे महत्व समजायला लागते. कारण वडाचे झाड हे घनदाट व विस्तीर्ण असते त्याची सावली अतिशय थंडगार असून झाडाखाली भरपूर ऑक्सिजन मिळतो. मूर्च्छित पडलेला सत्यवान हा भरपूर ऑक्सिजन व थंडगार सावलीमुळे शुद्धीवर आला असेल. असा वैज्ञानिक दृष्टिकोन शोधता येतो.

वडाच्या झाडाचे अधिक महत्त्व : वडाचे झाड हे भारतीय संस्कृतीमध्ये खूप महत्त्वाचे मानले जाते. त्याला धार्मिक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक दृष्ट्या खूप महत्त्वाचे स्थान आहे. वड हे मूळतः आशिया पॅसिफिक उपखंडातील आहेत. हे झाड स्वतः सहनशील असून दुष्काळातही ते तग धरून



राहते. झाडाखाली जमिनीत पाण्याचा साठा असतो ते जमिनीची धूप होऊ देत नाही. वडाच्या झाडांच्या पानांमध्ये कच्चे प्रथिने, तंतू, कॅल्शियम, ऑक्झालेट, फॉस्फरस, फ्लेहोनॉल आढळते. वडाचे झाड हे फॅटी ॲसिड असलेल्या तेलाचा असामान्य समृद्ध स्त्रोत आहे जो औद्योगिक वापरासाठी वापरला जातो. मातीच्या संवर्धनासाठी आणि ती विखुरण्यापासून वाचविण्यासाठी वडाची झाडे महत्त्वाचे आहे. या झाडांच्या लाकडाचा वापर फर्निचर आणि कागदाच्या लगद्यासाठी केल्या जातो. पानांचा वापर चारा म्हणून करतात तर वडाच्या झाडांचे वेगवेगळे भाग वेगवेगळ्या पारंपारिक औषधांमध्ये औषधी म्हणून वापरले जाते. या झाडांमध्ये विविध प्रकारच्या रासायनिक संयुगे तयार करण्याची संयुगे आहेत. वडाच्या झाडांमध्ये असलेले फायटोकेमिकल्स मानवांनी वितरित केल्यानंतर दीर्घकालीन आरोग्यावर महत्त्वपूर्ण परिणाम करतात. आयुर्वेद औषध पद्धतीनुसार, वडाची साल, फळे, आणि पारंब्या मुळे हे मधुमेह बरा होण्यासाठी वापरतात, कर्करोग, मलावरोध, विविध त्वचेचे आजार, अल्सर, दमा, मूळव्याध, रक्ताक्षय आणि मूत्रविकारांवर या झाडांपासून बनवलेली औषधी वापरतात. झाडाच्या सालीचा अर्क अँटी ॲलर्जी म्हणून वापरला जातो तर मधुमेह विरोधक पण आहेत. अशा प्रकारचे अनेक फायदे या झाडांपासून होतात. वडाच्या झाडाचा एकही भाग वाया जात नाही म्हणून त्याला आयुर्वेदात जास्त महत्त्व आहे.

सामाजिक अनुबंध : या झाडाने अनेकांची सुखदुःखे ऐकलेली आहेत. नफा-तोटा पाहिलेला आहे. अनेक निर्णयांचे साक्षीदार हे झाड राहिलेले आहेत. पूर्वीच्या काळात याच झाडाखाली बसून व्यापारी व्यापार करत होते, तर गावोगावी याच झाडाखाली महत्त्वाच्या सभा भरायच्या, पायवाटेने जाणारे वाटसरू याच झाडाखाली विसावा घ्यायचे. अनेक वर्षापासून स्त्रिया केवळ पूजेचे साहित्य सोबत घेऊन जात नाहीत तर त्या विविध विचार, सुखदुःख सोबत घेऊन जात असतात आणि पूजेच्या वेळी सर्व मैत्रिणी,लहान-मोठ्या सर्व स्त्रिया एकत्र येतात. एकमेकींचे सुख दुःख वाटून घेतात विचारांची देवाण-घेवाण होते सर्व मतभेद विसरून स्त्रिया या दिवशी वडाच्या साक्षीने एकमेकांची ओटी भरण करतात. या दिवसात आंबे जास्त प्रमाणात असल्याकारणानें एकमेकींना आंबे दिले जातात. आणि खरंतर हे फळ आरोग्याच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचे आहे. लग्न झालेली स्त्री अखंड सौभाग्यवतीचे साकडं घालते, जन्मोजन्मी हाच पती मिळवा म्हणून प्रार्थना करते. खरं तर वडाचे झाड हे खूप विस्तीर्ण असून ते एखाद्या मोठ्या कुटुंबातील कर्त्या पुरुषाप्रमाणे भासते. त्याच्या छत्रछायेत असंख्य पशु - पक्षी, कीटक, छोटी रोपटे, थकलेले मानव सामावून जाते. सर्वांना सारखीच सावली, सारखाच ऑक्सिजन देत सतत पक्षांच्या किलबिलाट सहन करत हे वटवृक्ष शांत , संयमी असून हिरवे गार सुंदर दिसते. या वृक्षाचे आयुर्मान हे पाचशे वर्षाहून जास्त आहे. पतीचे आयुष्यही प्रदीर्घ असावे त्यांच्या छत्रछायेत कुटुंब हसत खेळत राहावं अशी प्रार्थना स्त्रिया या दिवशी करतात.

पर्यावरण अनुबंध : पर्यावरण म्हणजे काय ? तर आपल्या आजूबाजूचा सर्व परिसर, हवा, पाणी, माती, पशुपक्षी सर्व काही. पर्यावरण आणि स्त्रिया यांचा तसा जवळचा व घनिष्ठ संबंध आहे. बदलत्या हवामानात पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज बनली असून निसर्गचक्र जलद गतीने फिरत आहे. त्याचे दुष्परिणाम सर्वांनाच भोगावे लागताहेत. मग यासाठी जागतिक पातळीवर मोठ मोठ्या परिषदा होतात, करार होतात, आणि ते कागदावरच राहतात. खरंतर पर्यावरण वाचवण्याची, संवर्धन करण्याची जबाबदारी ही सर्वांचीच आहे. याची सुरुवात प्रत्येकाने स्वतः पासून करावी. म्हणूनच भारतीय संस्कृतीमध्ये असे सण उत्सव आहेत ज्यामध्ये निसर्गाला देवता मानले जाते. वटसावित्री पौर्णिमा ही ज्येष्ठा मध्ये येते म्हणजेच पावसाळ्याच्या सुरुवातीला हे वातावरण वीज रुजवण्यासाठी अनुकूल असते. या सणा निमित्ताने पाच ते दहा स्त्रिया मिळून एक वडाचे झाड लावले तर पुढील सात पिढ्या या पृथ्वीवर आनंदाने राहतील. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात,

पूर्वजांनी जो हेतू योजिला/तो पाहिजे समजोनी घेतला/त्याची उद्देशाप्रमाणे झाला पाहिजे/ सणवार म्हणजेच, आपल्या पूर्वजांनी अतिशय योजनाबद्ध सण समारंभ केलेले आहेत. तसेच आपणही त्या पद्धतीने पुढे चालू ठेवावीत. जेणेकरून परिसरातील कोणालाही त्रास होऊ नये. वडाची पूजा करत असताना सर्वात पहिले तिथे स्वच्छता करावी, झाडाला पाणी घालावे, एक मोठा कपडा अंथरून त्यावर सर्व महिलांनी पूजा करावी, झाडाच्या खोडाजवळ कोणीही दिवा लावून ठेवू नये. या त्यामुळे झाडे जळून जाण्याची शक्यता असते. आपण पूजेनिमित्त जे काही पदार्थ फळे तिथे ठेवले असतील ते गावातील गरिबांना देऊन टाकावित. तसेच तिथे पडू देऊ नये, खूप जास्त प्रमाणात फुले पाने वाहू नयेत, आजूबाजूला स्वच्छता ठेवून शांततेत पूजा करावी. जेणेकरून सर्व वातावरण प्रसन्न राहील. पूजेच्या ठिकाणी एखादे मंदिर असेल तर त्या भोवती फुलांचे





झाड लावावी व त्यांचे संवर्धन करावे.

भारत वर्षाची चालीरीती/ अत्यंत योजनाबद्ध होती/ त्याने सहज चालू सुस्थिती/ समाजाची संत तुकडोजी महाराज, भारत वर्षाची परंपरा ही अत्यंत योजनाबद्ध असून सण उत्सवामुळे सांस्कृतिक, सामाजिक, एकतीची मूल्य जोपासली जातात. हा सण प्रेमाचा, जिव्हाळ्याचा, संकल्पनेचा, आनंदाचा आहे. वटवृक्षाचे व स्त्रीचे नाते अतुलनीय आहे. या नात्यामधूनच पर्यावरणामध्ये सकारात्मकपणे शाश्वत बदल घडून येईल या सदिच्छेसह सर्वांना वटसावित्री पौर्णिमेच्या खूप खूप शुभेच्छा.

उत्सव मानवाचा स्वभाव सणवार मुहूर्ताचासासी गौरव/ विशेष कार्यासाठी धाव /नेहमी त्याची//<br>
संत तुकडोजी महाराज.

**डॉ. संध्या आयस्कर**<br>
प्रभारी प्राचार्य<br>
महिला कला महाविद्यालय, बीड.<br>
**डॉ. प्रतिभा आघाडे**<br>
(गृहविज्ञान विभाग)<br>
कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (ली.)

# जिल्ह्यात रणनीतीत सामाजिक विचारांवर भर

## छोट्या–मोठ्या आघाड्यांचे बैठकसत्र सुरू; नागरिकांचे प्रश्न आता गांभीर्याने

पात्रुड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील नगरपालिका निवडणूक जसजशा जवळ येत आहेत, तसे राजकीय पक्ष व आघाड्या ससज्ज होत आहे. राजकीय पक्ष मुळात निवडणुका लढविण्यासाठीच आहे, असे मानले जात आहे. परंतु विविध सामाजिक संघटनांचे एकत्रिकरण करून समाजातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी छोट्यामोठ्या आघाड्या तयार करीत आहे. त्यांच्या बैठकांचे सत्र सध्या सुरू आहे. निवडणुकीपूर्वीची ही तयारी ऐन मतदानावेळी मतदारांच्या किती पसंतीला उतरतील, याकडे सर्वांच्या नजरा राहणार आहे.

निवडणुका या आता मतदारांच्या मतदानापुरत्याच उरल्या नाहीत. या निवडणुकांना सामाजिक अडचणी व समस्यांचे कोंदणही चिकटले आहेत. त्यामुळे सामाजिक संस्था समाजाचे प्रश्न व नागरिकांच्या अडचणींना एकसुत्रात बांधण्याचा प्रयत्न करीत आहे.

गेल्या काही वर्षात प्रत्येक निवडणुकीत हिंदू–मुस्लीम व इतर राजकीय मुद्यांना समोर करून निवडणुका लढल्या गेल्या. समाजाचे व मतदारांचे प्रश्न कायम आहेत. या प्रश्नांनी तोंड वर काढल्यानंतर सामाजिक संघटनांची जबाबदारी वाढली आहे. त्यांच्या कामाकडे नागरिकही मोठ्या अपेक्षेने बघत आहे. परिणामी, बीड शहरात अशा अनेक संघटना सक्रिय झाल्या आहेत. या संघटनांमध्ये काम करणारे अनेक कार्यकर्ते हे थेट नागरिकांशी जुळलेले आहेत. त्यांना ते आपल्या हक्काचे वाटतात. त्यांच्या प्रत्येक सुखदु:खात सहभागीही होतात. त्यामुळे ही व्याप्ती अधिक वाढवून जगण्याचे प्रश्न अधिक सुलभ करण्यासाठी या संघटनांनी पुढाकार घेण्यास सुरुवात केली आहे.

राज्यात राजकीय पक्षांचे कार्यकर्ते हे त्यांच्या पक्ष व नेत्यांशी बांधील आहेत. उलट सामाजिक संघटनांना कुणाचेही बंधन नाही. ते राजकीय अडचणीत येण्याची शक्यताही नाही. परिणामी, त्यांना समाजातील प्रश्नांची असलेली जाण लक्षात घेता राजकारणाच्या रिंगणात उतरून त्या त्या भागाचे प्रश्न राजकीय पटलावर आणण्यासाठी दबाव वाढत आहे. यातूनच छोट्या मोठ्या आघाड्या आकार घेत आहे.बीड जिल्ह्यात अशा अनेक आघाड्यांच्या बैठकांचे सत्र सुरू आहे. या आघाड्या अनेक समाजघटकांशी संबंधित असल्याने समाज म्हणून व समाजातील व्यक्ती म्हणून त्यांच्यापुढे मनमोकळेपणाने आपले प्रश्न मांडण्यासाठी कुठलीही अडचण येणार नाही, अशी पक्की समज अनेक भागातून पुढे येत आहे.

ओबीसी, मुस्लीम प्रतिनिधीही सरसावले गेल्या काही वर्षात निवडणुकीत जातीपातीच्या राजकारणाने डोके वर काढले आहे. राजकीय पक्षांनी या जातीपातीतील प्रतिनिधींना आपले हक्काचे मतदार बनविले. निवडणुकीपर्यंत त्यांचा वापर केला जातो. प्रत्यक्षात त्यांच्या समाजाचे प्रश्न कायम आहे. ओबीसी हा मोठा घटक आहे. अवघ्या राज्यात ओबीसी समाज घटकाचे प्रश्न आजही चर्चेत आहेत. अनेक मोठ्या संघटना यासाठी संघर्षरत आहेत. मोठा मतदार असल्याने या संघटनांशी जुळलेले हजारो कार्यकर्ते निवडणुकीत निकालाची दिशा बदलवू शकतात. मुस्लीम समाजातही आता त्यांच्या वापरावरून चीड निर्माण होत आहे. मुस्लीम मतदारांची संख्याही जिल्ह्यात लक्षवेधी आहे. अशा अनेक संघटनांनी धर्मनिरपेक्षता व सामाजिक एकतेचा विचार करून एकत्रितपणे समाजाचे प्रश्न सोडविनाचा चंग बांधला आहे

आंबेडकरी विचारांचे बळकटीकरण, एकसुत्रीपणासाठी विचारमंथन सुरू रिपाइं कायम गटातटात विखुरलेला पक्ष आहे. आता या पक्षातली अनेक गट इतर पक्षांच्या युतीत बांधले गेले आहेत. त्यामुळे आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यामध्ये अस्वस्थता पसरली आहे. यातूनच नवनव्या आघाड्या तयार होत आहे. या आघाड्यांमध्ये आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांचा समावेश असून त्यांची वैचारिक प्रगल्भता शाबूत आहे. त्यांना समाजाचे हित व प्रश्नांची जाण आहे. यातूनच निर्माण झालेल्या अनेक छोट्या मोठ्या आघाड्या व संघटनांमध्ये एकसुरीपणा आणण्यासाठी विचारमंथन सुरू आहे.

# प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन साजरा




अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शुक्रवार, दि.६ जुन रोजी शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे व्हिडिओद्वारे ऑनलाईन उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते बिपिन क्षीरसागर उपस्थित होते. प्रमुख वक्ते तथा सामाजिक कार्यकर्ते गुरूगोविंद सोन्नर यांनी 'स्वदेशी विचारांचा प्रसार' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाची संकल्पना महाराष्ट्र राज्याचे कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री ना.मंगल प्रभात लोढा मंत्री यांची होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटनिदेशक श्रीमती एस.ए.क्षीरसागर या होत्या. तसेच विचारमंचावर आयएमसी मेंबर बनसोडे व शिल्प निदेशक श्रीमंत ओव्हाळ हे उपस्थित होते. उद्घाटनानंतर कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनीषा वर्मा (भा.प्र.से.) यांनी ऑनलाईन व्हिडिओद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन केले. बिपिन क्षीरसागर यांनी मार्गदर्शन केले. तर प्रमुख वक्ते गुरूगोविंद सोन्नर यांनी शिवाजी महाराज यांच्या कार्याविषयीची माहिती सांगितली. सुरूवातीला कौशल्य गीत सादर झाले.

प्रास्ताविक शिल्प निदेशक रामदास वैरागे यांनी केले. संचालन विलास होळीकर यांनी तर उपस्थितांचे आभार श्रीमंत ओव्हाळ यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे प्राचार्य पी.टी.मुने यांच्या मार्गदर्शनाखाली विजय साबळे, भरत म्हेत्रे, राहुल माशाळकर, अमित लोमटे यांच्यासह सर्व शिल्प व तासिका निदेशक निदेशक तसेच शिल्प निदेशक भाग्यश्री पाटील, शिल्प निदेशक सुवर्णा गवळी, भांडारपाल अभय पोटपल्लेवार अभय, वरिष्ठ लिपिक निलेश म्हातारमारे, मुख्य लिपीक रमेश धस व इतर सर्व कर्मचारीवृंद यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमासाठी संस्थेतील सर्व आजी – माजी प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# एस. के. एच. मेडिकल कॉलेजमध्ये दिव्यांगांसाठी होमिओपॅथिक शिबिर यशस्वीरित्या संपन्न

बीड । प्रतिनिधी




आदर्श शिक्षण संस्था संचलित सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय, बीड आणि प्रिडीक्टिव्ह होमिओपॅथी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ०८ जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेले दिव्यांग होमिओपॅथिक शिबिर अत्यंत यशस्वीरीत्या पार पडले.

शिबिरादरम्यान डॉ. अनिकेत शितोळे, डॉ.योगेश खर्चे यांनी च्या सिद्धांतानुसार प्रत्येक रुग्णाची सखोल घेऊन, विश्लेषण करून एकूण ३४० रुग्णांची तपासणी केली व होमिओपॅथिक औषधोपचार दिले. यामध्ये मतिमंदता, गतिमंदता, मूकबधिरता, झटके आणि इतर असाध्य आजार असलेल्या बालकांचा समावेश होता.शिबिरात ३५ पेक्षा अधिक स्वयंसेवक, १९ डॉक्टर्स, तसेच ३६ आंतरवासियता प्रशिक्षणार्थी विद्यार्थी यांनी सहभागी होऊन शिबिराच्या यशस्वीतेसाठी मदत केली. अनेकांनी याआधी केलेल्या उपचारांमुळे निराशा आली होती, परंतु या शिबिरात दिलेल्या उपचार व मार्गदर्शनामुळे पालकांच्या चेहऱ्यावर आशेचा किरण दिसत होता.

काही रुग्णांमध्ये आधीच्या शिबिरांतील उपचारांमुळे सुधारणा दिसून आली तसेच काही अत्यंत दुर्मिळ व गुंतागुंतीच्या केसचा अभ्यास करणे ही विद्यार्थी व डॉक्टर्ससाठी शैक्षणिक संधी ठरली. या उपक्रमाचे नेतृत्व जगप्रसिद्ध झीशवळलींर्ळींश बेशेरींहू संकल्पनेचे प्रवर्तक कै. डॉ. प्रफुल्ल विजयकर यांच्या विचारधारेवर आधारित असून हे शिबिर संस्थेचे सचिव श्री. जयदत्त अण्णा क्षीरसागर (माजी मंत्री, महाराष्ट्र सरकार) यांच्या प्रेरणेतून गेली १५ वर्षे सातत्याने आयोजित केले जात आहे. सदर शिबिर महाविद्यालयाचे मार्गदर्शक डॉ. अरुण भस्मे, प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल, उप–प्राचार्य डॉ. गणेश पांगारकर, बाहयरूग्ण विभाग प्रमुख डॉ.अंजली पांगारकर, शिबिर समन्वयक डॉ. अमित भस्मे, बालरोग विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. पूनम शिंदे, सामाजिक कार्यकर्ते श्री. मुळी (सोशल वर्कर) यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आले होते. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी पदव्यूत्तर विभागातील विद्यार्थी डॉ. दिपक काळभिले, डॉ. ऋषीकेश मोहिते, डॉ. अहिल्या गावडे, डॉ. कोमल शिंगणे, नायाब खान, अमान खान, सोनाली क्षीरसागर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# बांधकाम कामगार मंडळातील चव्हाण, कुंभार यांचा सर्रास बोगस कारभार चालू याला आळा घालण्यासाठी मोर्चा काढणार : प्रा.सापनकर

बीड । प्रतिनिधी

बीड तालुका कामगार मंडळातील कर्मचारी सुरेश चव्हाण व सचिव विवेक कुंभार हे वरिष्ठ कर्मचारी असून बीड जिल्हातील जिल्हा कामगार अधिकारी व कंत्राटी कर्मचाऱ्यांना तुषार कुंभार व प्रवीण सुरवसे यांना पाठराखण करतात या सचिव पासुन ते बीड तालुका कर्मचारी सह कंत्राटी कर्मचारी ठेवून सरास गोरगरीब जनतेची दिशाभूल चालू आहे बोगस कारभार पैसे घेऊन डुप्लिकेट काम सुरू आहे व सरकारी कर्मचाऱ्यांना या योजनेचे लाभ देतात खरे कामगार वंचित बाजूलाच राहिले हे निदर्शनात आल्यानंतर दिनांक २३ /०४/ २०२५ रोजी माहितीचा अधिकार माजी जिल्हा अधिकारी मुंडे यांच्याकडे ऑफिसला जाऊन सपुर्द केला होता तरी एक महिना होऊन सुद्धा माहिती अधिकाऱ्याची योग्य ती माहिती देऊ शकत नाही वारंवार फोन करून सुद्धा ऑफिसला कामकाजाच्या वेळेत उपस्थित नसतात हे उद्धट वागणं सुरेश चव्हाण व सचिव विवेक कुंभार यांच्यामुळे बीड बोगस कारभार चालू आहे योग्य आहे का असा सवाल पडत आहे.



एक महिन्यानंतर कुठल्याही कंत्राटी कर्मचाऱ्यावर कारवाई झाली नाही सचिवांनाही वारंवार कल्पना देऊन त्यांनीही कुठलाही प्रकारची कारवाई केली नाही जर असंच चालू राहिलं तर गोरगरीब जनतेला लुटल्या शिवाय हे कर्मचारी राहणार नाही म्हणून जिल्हाधिकारी महोदयांना निवेदन देऊन सुद्धा या लोकांना कुठल्याही प्रकारची गांभीर्य दिसत नाही म्हणून लवकरच जिल्हाधिकाऱ्यांना भेटून रितसर परवानगी काढण्यात येणार आहे. जिल्हा कार्यालय समोर उपोषणा बसण्याचा इशारा राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रा, सापनकर व खरे कामगारांना सोबत घेऊन व पत्रकार बांधवांना घेऊन या कर्मचाऱ्यांचा बोगस कारभार जिल्ह्यासमोर उघडकीस आणणार आहे या कर्मचाऱ्यांना कुठल्याही प्रकारचे गांभीर्याने घेत नाहीत जोपर्यंत त्यांच्यावर कारवाई होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण सोडणार नाही असा इशारा देत आहे.

माहितीचा अधिकार देऊन सुद्धा त्यांनी त्या माहितीचा अधिकार योग्य दिला नाही टाळाटाळ करत आहेत सरस बीड जिल्ह्यात बांधकाम कामगार मंडळामध्ये पैशाचा लुटमार गोरगरीब जनतेची पिळवणूक होत आहे तरीपण तालुका कामगार मंडळ चे अधिकारी सुरेश चव्हाण डोळे झाकून बसले आहे. सरास कंत्राटी कर्मचारी व सहबाकी कर्मचारी बाहेर कामगारांना बोलून पैसे उकळण्याचा काम करतात ही गंभीर बाब असून सुद्धा कारवाई होत नाही याप्रकारचे गांभीर्याने घेतला नाही. सचिव विवेक कुंभार व सुरेश चव्हाण काही लोकांना हाताखाली धरून सररसा गोरगरीब जनतेला लुटण्याचे काम सुरू बीड जिल्हा चे पालकमंत्री अजित दादा पवार साहेब या विषयाकडे लक्ष द्या नसता गोरगरीब जनता रोडवर आल्या शिवाय राहणार नाही राष्ट्रीय समाज पक्ष आक्रमक भूमिका घेतल्या शिवाय राहणार नाही असं इशारा प्रा सापनकर यांनी दिला आहे.

# समृद्ध लोकशाही उभारण्यासाठी ॲड. आंबेडकरांचा सामाजिक अभिसरणाचा प्रयोग : भोजने

बीड । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे प्रणेते तथा राष्ट्रीय अध्यक्ष ड.प्रकाश आंबेडकर यांनी १९८० पासून सक्रिय राजकारणास सुरुवात केली. महाराष्ट्राच्या राजकारणात विविध प्रयोग राबवित सत्तेमध्ये सहभागी व्हायचा प्रयत्न केला परंतु स्वयंघोषित बुद्धिजीवी विचारवंत यांनी त्याच्या भूमिका गोपनीय बैठका घेऊन मोडून तोडून ऐकीव कथा रचल्या, प्रकाश आंबेडकरांनी काँग्रेस सोबत युती करायला हवी होती असे चहाच्या टपरीवर बसून चर्चा घडवून आणायच्या, पंढरपुरातील मंदिर उघडणे अशा विविध भूमिकेला मोडून तोडून मांडणी केल्याने वंचितचा मतदार दुरावत गेला असे वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष अजय सरवदे यांनी प्रतिपादन केले.



महाराष्ट्राच्या राजकारणात व समाजकारणात ४२ वर्षाच्या वाटचालीमध्ये प्रकाश आंबेडकरांनी शांतीदुताची भूमिका पार पाडली. विविध जाती धर्मांच्या समूहांना एकसंध जोडून वंचित,उपेक्षित घटकांना न्याय मिळवून दिला.असे प्रतिपादन फुले शाहू आंबेडकर विद्वत्त महासभेचे राष्ट्रीय सल्लागार भास्कर जी भोजने यांनी यावेळी केले. आता तरी प्रकाश आंबेडकरांना समजून घ्याया परिसंवाद मेळाव्याच्या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून भोजने बोलत होते.याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना भास्कर जी भोजने यांनी ॲड. प्रकाश आंबेडकरांनी उभारलेल्या सामाजिक, राजकीय, भूमिकां बद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी विचार मंचावर वंचित बहुजन आघाडी बीड (प) चे जिल्हा, तालुका, शहर पदाधिकारी यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे बुधवार रोजी केशव म.चावरे यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी



विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील दहावी पुण्यतिथी जेष्ठ शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प.केशव महाराज चावरे अण्णा वारकरी मंडळ मराठवाडा अध्यक्ष यांचे बुधवार दि.११ जून २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मानकुरवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नातून ३० कोटींच्या रस्ते व पुल बांधकाम आणी रस्ते सुधारणा प्रकल्पांना गती

परतूर । प्रतिनिधी

दिनांक ०८ जून २०२५ परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार आणि महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून मतदारसंघातील रस्ते सुधारणा आणि पुल बांधकामासाठी एकूण ३० कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. या निधीमुळे परतूर तालुक्यातील वाटूर ते लावणी, पोखरी पाटी ते त्रिफुली आणि जयपूर ते बेलोरा या रस्त्यांचे खडीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण तसेच रुंदीकरण (३.७५ मीटरवरून ५.५० मीटर) होणार आहे. याशिवाय, लावणी ते पळसखेडा रस्त्याची सुधारणा आणि वाटूर–जयपूर रस्त्यावरील पुलाचे बांधकामही या निधीतून पूर्ण होईल.

निधीचे वितरण खालीलप्रमाणे आहे. वाटूर ते लावणी (७ किमी) खडीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण आणि साईड पंखे मुरमाने भरण्यासाठी १२ कोटी ५० लाख रुपये. पोखरी पाटी ते त्रिफुली आणि जयपूर ते बेलोरा (७ किमी) खडीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण आणि रुंदीकरणासाठी १२ कोटी ५० लाख रुपये. लावणी ते पळसखेडा रस्ता सुधारणा: २ कोटी ५० लाख रुपये. वाटूर–जयपूर रस्त्यावरील पुल बांधकाम २ कोटी ६५ लाख रुपये.

या प्रकल्पांसाठी निधी मंजूर करवून घेण्यासाठी आमदार बबनराव लोणीकर यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या या अथक प्रयत्नांमुळे हा निधी उपलब्ध झाला असून, परतूर मतदारसंघातील दळणवळण सुविधा सुधारण्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

या रस्त्यांच्या कामांचे उद्घाटन आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. मात्र गुत्तेदार नळगे, खालापुरे, कुलकर्णी आणि देशमुख यांनी कामात टाळाटाळ केल्याने काही अडचणी निर्माण झाल्या होत्या. याबाबत दिनांक ०८ जून २०२५ रोजी रविवारी सकाळी आमदार बबनराव लोणीकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसह आढावा बैठक घेतली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना आणि गुत्तेदारांना आक्रमकपणे खडसावत कामाला गती देण्याचे निर्देश दिले. परिणामी, गुत्तेदारांनी कामाचा वेग वाढवला असून, लवकरच हे प्रकल्प पूर्ण होण्याची शक्यता आहे.या रस्त्यांच्या सुधारणेमुळे परतूर तालुक्यातील वाहतूक सुलभ होणार असून, गावागावातील नागरिकांना प्रवासात येणाऱ्या अडचणी कमी होतील. स्थानिक नागरिकांनी या विकासकामांबद्दल समाधान व्यक्त केले असून, आमदार बबनराव लोणीकर यांचे विशेष आभार मानले आहेत. आमच्या भागातील रस्त्यांची दुरवस्था संपणार आहे.



परतूर मतदारसंघातील प्रत्येक गावाला चांगल्या दळणवळण सुविधांनी जोडणे हे माझे प्राधान्य आहे. या रस्त्यांच्या सुधारणेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मी आभार मानतो, असे आमदार लोणीकर यांनी स्पष्ट केले.






# गोरगरीबांना अहोरात्र मदत करणारे समाजसेवक शोहेब हफीज इनामदार

## लोकप्रश्न तात्काळ सोडविणारे लोकसेवक म्हणजे शोहेब हफीज इनामदार

बीड जिल्हा हा लोकसेवा करणाऱ्यांची खाणच आहे अनेक लोकसेवकांनी आपल्या कार्यातून ओळख निर्माण केली आहे त्यातीलच एक म्हणजे अहोरात्र लोकांच्या समस्या सोडविणारे गोरगरीबांचे आधार म्हणजे समाज सेवक शोहेब हाफिज इनामदार होय. सर्वसामान्य कुटुंबातून आले असल्याने त्यांना गरीबांच्या रोजरोजच्या समस्यांची जाणीव असल्याने त्यांनी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी समाजसेवा करण्याचा निर्णय घेतला यासाठी राजकीय शक्ती सोबत असणे आवश्यक असल्याने त्यांनी बीड विधानसभेचे राष्ट्रवादीचे लोकप्रिय आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांच्या सहकार्याने लोकसेवा सुरू केली त्यांना या कामी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते मा. आमदार सय्यद सलीम यांचे मार्गदर्शन लाभले यामुळे त्यांच्या कार्यात तत्परता आली.

अपघातग्रस्त व गंभीर रूग्णांना रक्ताची गरज भासताच त्यांनी तात्काळ रक्त पिशवी देऊन त्यांचा जीव वाचवला आहे. कोणी अनओळखी व्यक्तीने मदतीसाठी फोन केल्यास ते तात्काळ मदत करतात एक कॉल आणि प्रॉब्लेम सॉल अशी त्यांची समाजसेवेची ओळख आहे. सरकारी दवाखान्यात गरीब रुग्णांना मदत करणे, गरीबांना फळे वाटप करणे, तहसील कार्यालयात गरीबांना मोफत रेशनकार्ड उपलब्ध करून देणे. आपल्या मित्रमंडळा मार्फत रक्तदान शिबीर घेऊन त्यात शेकडो युवकांनी रक्तदान केल्याने रक्त टंचाईच्या काळात हे रक्त खुप कामी आले व यामुळे अनेकांचे प्राण वाचल्याने खऱ्या अर्थाने समाजसेवक शोहेब हाफिज इनामदार हे गोरगरीबांचे देवदुत व मसीहा ठरले आहेत.



आपल्या भागातील विकासकामे दर्जेदार करण्यासाठी ते स्वत: रस्त्यावर उभा राहुन ते काम पूर्ण होई पर्यंत स्वस्थ बसत नाहीत त्यामुळे इथले रस्ते,नाली व इतर कामे खुप चांगले व टिकाऊ झाले आहेत. लाईटची समस्या आली केते दिवस असो की रात्र ती दुरुस्त होई पर्यंत तिथेच उभे असतात त्यामुळे लाईट लवकर दुरुस्त होऊन या विभागातील लोकांना उकाड्या पासून सुटका होऊन अंधारातून सुटका होऊन दैनंदिन कार्यात मदत होत आहे. हिंदू मुस्लिम ऐक्य अबाधित राखण्यासाठी ते सहकार्य करीत असल्याने ते सामाजिक सलोख्याचे जनकच ठरले आहेत.

पंतप्रधान आवास योजनेमध्ये गरीबांना घरकुलाचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांनी खुप सहकार्य केले आहे.कोरोना काळात त्यांनी हातावर पोट असणाऱ्या गोरगरीबांना किराणा किटचे वाटप करून आधार दिला आहे. मुस्लिम बांधवांचा पवित्र सण ईदला त्यांनी गरीब मुस्लिम कुटुंबाना शीरकुर्मा किट वाटप करून आधार दिला आहे. सामाजिक कार्य म्हणून रुग्णांना फळे वाटप, वृक्षारोपण व श्री दत्ता बारगजे यांच्या इन्फंट इंडियातील एड्सग्रस्त व कुष्ठरोगी बालकांना अन्नदान करून त्यांनी अनमोल सहकार्य केले आहे.

सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी खा. बजरंग बप्पा सोनवणे यांना आपल्या विभागात आघाडी मिळवून देऊन त्यांच्या विजयात खारीचा वाटा उचलला आहे. तसेच विधानसभा निवडणुकीत आ. संदिप भैय्या क्षीरसागर यांना आपल्या विभागात मोठे मताधिक्य मिळवून देत त्यांच्या विजयात सिंहांचा वाटा उचलला आहे, असे हे गोरगरीब व सर्वसामान्यांना अहोरात्र मदत करणारे समाजसेवक शोहेब हफीज इनामदार यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

# अवकाळी पावसाने कांदा सडला कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात

## असंवेदनशील कृषीमंत्री म्हणतात ढेकळाचे पंचनामे करायचे का? पंचनामे करायला प्रशासनाला वेळ नाही : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. साठवणुक केलेला आणि बाजारात विक्रीसाठी तयार कांदा वादळीवाऱ्यासह पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे जमिनीतील ओलावा वाढल्याने कांद्याच्या साठवणुकीवर परीणाम झाला असून कांद्याला ओल लागली आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना हा कांदा मिळेल त्या भावात विकावा लागणार आहे परीणामी शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असुन तोंडचा घास हिरावला आहे.



**शेतकऱ्यांनी जगायचं कसं ? : कल्याण वाणी**

साडे ३ एकर कांद्याची लागवड करण्यात आली. जवळपास रोपं, बि बियाणे, खत, फवारणी आदि २ लाख रुपयांच्या वर खर्च झालेला आहे. अवकाळी पावसाने काही कांदा शेतातच सडला तर काढुन झाकुन ठेवलेला कांदा पाण्याखाली गेला आणि तो काळपट पडला आहे तर काही कांद्याला कोंब फुटले आहेत. सध्या चांगल्या कांद्याला १५ रुपये पर्यंत भाव आहे. मग या काळपट पडलेल्या कांद्याला कोण विचारणार? सरकारचे धोरण चुकीचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही आणि दुष्काळात तेरावा महिना म्हणल्याप्रमाणे अवकाळी पाऊस आणि महसूलचे अधिकारी पंचनाम्यासाठी फिरकत नाहीत आता तुम्हीच सांगा शेतकऱ्यांनी कसं जगायचं असा उद्विग्न सवाल लिंबागणेश येथील कांदा उत्पादक शेतकरी कल्याण भालचंद्र वाणी यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना केला.

**कृषीमंत्री जिथं ढेकळाचे पंचनामे करायचे का?**

गेल्या आठवड्यात सिन्नर तालुक्यात अवकाळी पावसाने झालेल्या पिकांच्या नुकसानीची पाहणी करताना शेतातुन बाहेर काढुन ठेवलेल्या कांद्याचे पंचनामे करण्यात येऊन नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केल्यानंतर असंवेदनशील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी काढलेल्या पिकांचे पंचनामे करून काय करायचे? ढेकळाचे पंचनामे करायचे का? असा सवाल शेतकऱ्यालाच विचारला.तसेच शेतात पडलेल्या कांद्याचे पंचनामे करायचे हे नियमात बसत नाही असे म्हणत शेतकऱ्यांबद्दल सहानुभूती पुर्वक विचार करण्याची मानसिकता नसल्याचे दाखवून दिले. त्यामुळे महसूल प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी पंचनामे करायला कशाला पुढाकार घेतील असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे.

## आमदार धनंजय मुंडे यांना सरपंच सोहेल पठाण यांचे निवेदन

### सिरसाळा येथील आहे त्याच जागेवर घरकुल बांधकामास परवानगीची मागणी

सिरसाळा । प्रतिनिधी



परळी तालुक्यातील सिरसाळा येथे पंतप्रधान आवास घरकुल योजना विविध घरकुल योजना अंतर्गत गावातील बहुतांश लाभार्थींना घरकुल मंजुर आसुन संबंधित लाभार्थी याच्याकडे स्वत:ची मालकीची जागा नसल्यामुळे लाभार्थींना आडचण निर्माण होत आहे. मंजूर लाभार्थी हा शासनाच्या जागेवर २० ते ४० वर्षापासून भोगावटाधारक म्हणून वास्तव्य करत आहे. मालकीची जागा खरेदीसाठी पंडित दीनदयाळ योजनेअंतर्गत मिळणारी रक्कम अपुरी असून सिरसाळा येथील भूखंडाचे बाजार मूल्य हे अतिशय महागडे आहे त्यामुळे त्यांना शिवारात जागा उपलब्ध होत नाही त्यामुळे वेळेत घरकुल बांधकामाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यास अडचण निर्माण होत आहे.

तरी सन २०११ च्या पूर्वीचे भोगावट धारकांना अतिक्रमण नियम अकुल करण्याचे शासनाचे निर्णय झालेल्या असून त्याच निर्णयाचा भाग म्हणून सिरसाळा येथील पंतप्रधान आवास घरकुल योजना १२५४ पैकी ६५४ मंजूर घरकुल लाभधारकांना आहे त्याच जागेवर घरकुल बांधण्याची परवानगी मिळावी. त्यामध्ये मालकीची जागा असावी अशी अट शितल करण्यात यावी अशी मागणी मा.आमदार धनंजय मुंडे साहेबाकडे सिरसाळा ग्रामपंचायत चे सरपंच सोहेल पठाण यांनी येत्या निवेदनाद्वारे केली आहे.

## मुख्याधिकाऱ्यांचे झोपेचे सोंग? समस्यांकडे डोळेझाक; नागरिक त्रस्त

धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरात नागरिक अनेक समस्यांमध्ये अडकलेले आहेत, पण नगरपरिषद प्रशासन मात्र झोपेचे सोंग घेत आहे. मुख्याधिकारी धारूर यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही उपाययोजना होत नाहीत. शहरातील रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून, नागरिकांचे जीव धोक्यात आले आहेत. कित्येकदा नागरिकांनी लेखी मागण्या करूनही कोणतीच कारवाई झालेली नाही. काही ठिकाणी लाईन टाकल्यानंतर खड्डे बुजवलेच गेले नाहीत, परिणामी पाऊस पडल्यावर साचलेल्या पाण्यामुळे रोगराईला आमंत्रण मिळत आहे. नवीन पाइपलाइनसाठी रस्ते उकरण्यात आले मात्र पुन्हा डांबरीकरण झाले नाही. अशा रस्त्यांवर वाहनचालकांचे हाल होत असून दुर्घटनाही घडत आहेत. अनेकदा मुख्याधिकाऱ्यांना जाग येईल अशी अपेक्षा नागरिकांनी ठेवली होती, पण ती फोल ठरत आहे. शहराचा विकास होण्याऐवजी



प्रशासकीय ढिसाळपणामुळे नागरिकांचे हाल वाढले आहेत. नगरपरिषद प्रशासनाने तत्काळ कार्यवाही करावी अन्यथा लोकांचा रोष अधिक उग्र होईल, हे लक्षात घ्यावे.

**मुख्याधिकारी साहेब... गल्लोगल्लीत फिरा चित्र विचित्र दिसेल एवढ्या समस्या**

मागील तीन वर्षांपासून शहरात प्रशासकराज सुरू आहे. या कार्यकाळात पायाभूत व मूलभूत सुविधा निर्माण करण्यावर कोट्यवधी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देत निधी खर्च केला. पण, शहरातील मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाल्याने सामान्य नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. गल्लीबोळात घाणीचे ढीग जमा झाले आहेत. तुंडूब भरलेल्या नाल्या व गटारांचे पाणी रस्त्यांवर आल्याने रोगराई पसरतेय, नळाला पंधरा पंधरा दिवस पाणी नाही. रस्त्यांची प्रचंड दुरवस्था या सर्व समस्यांकडे नगरपरिषद प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. सर्व सामान्य नागरिकातून मागणी मुख्याधिकारी साहेब... गल्लोगलीत फिरा अन् चित्र ऐवजी विचित्र चित्र दिसेल आमच्या दारी या अन् समस्या पाहून बोला अशी मागे होत आहे.

## सरकार माझ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देता का जाता : खेडकर, मोरे

बीड । प्रतिनिधी

सरकारविरोधात भव्य ट्रॅक्टर मोर्चा शिरूर कासार येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस क्या हुआ तेरा वादा शेतकरी बांधवांचे महत्वाचे १० मुद्दे घेऊन शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना उपनेत्या सुषमा आंधारे, संपर्कप्रमुख परशुराम जाधव, सहसंपर्क प्रमुख डॉ.लक्षराज सानप शिवसेना लोकसभा मतदारसंघ प्रमुख मा.आ.सुनिलदादा धांडे, सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब आंबुरे, शिवसेना जिल्हा प्रमुख उल्हास भैया गिराम, शिवसेना महिला संघटिका बीड प्रमिलाताई माळी यांच्या प्रयत्नाने शिरुर तालुक्यातील व आष्टि मतदारसंघाती शिवसेचे कार्यकर्ते उतरणार रस्त्यावर आहे.

शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करतो म्हणले, सत्ताधारी तिन्ही पक्षांनी शेतकऱ्यांना लगोलग





कर्जमाफी देण्याचा गाजावाजा केला तसेच वेळेत कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन अनुदानाचा पत्ता नाही सरकारने सरड्याला लाजवेल. इतके वेगाने रंग बदलला आहे कर्जमाफीची अपेक्षित असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक वर्ष संपत आले असताना कर्ज भरण्यासाठी सांगून अर्थमंत्री अजित पवारांनी त्यांची क्रूर थट्टा केली याच अनुसंघाने शेतकरी बांधवांसाठी शेतकरी बांधवांच्या हितासाठी शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाचा ट्रॅक्टर मोर्चा दिनांक ११/६ /२० २५ रोजी सकाळी ११ वाजता जिजामाता चौक ते तहसील कार्यालयापर्यंत ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात येईल या मोर्चामध्ये शिरूर तालुक्यातील तमाम शेतकरी बांधवांनी आपल्या ट्रॅक्टरसह दिनांक ११ वार बुधवार या दीवसी सकाळी १० वाजता शिरूर येथे उपस्थित राहावे असे आव्हान शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर व शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांच्या वतीने नम्रतेचे विनंती करून आपणास या मोर्चात मोठ्या संख्येने उपस्थित होण्यास कडव आव्हान करत आहोत. लालाभाई पठाण, साईनाथ ढाकणे, राजेश कोकणे, कलिम शेख, सागर बडे, लक्ष्मण केदार व शिरूर तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी खूप मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हावे.



## नगरपालिकेच्या विकास कामात भ्रष्टाचार वाढला : माधव निर्मळ

### धारूर नगरपरिषद प्रशासनाचा अवमेळ; सर्वसामान्य जनतेला लागेना ताळमेळ

धारूर । प्रतिनिधी

धारूर नगरपालिकेच्या विकास कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता दिसून येत असून मुख्याधिकारी आणि प्रशासक म्हणून कारभार एकाच व्यक्तीच्या हाती असल्यामुळे धारूर नगरपालिकेच्या विकास कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असून माननीय जिल्हाधिकारी साहेबांनी धारूर नगरपालिकेचा प्रशासक पदाचा कारभार उपजिल्हाधिकारी यांच्याकडे देण्यात यावा अशी मागणी माजलगाव मतदार संघाचे नेते माजी नगराध्यक्ष माधव निर्मळ यांनी केली आहे.

धारूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी गायकवाड यांनी आपला मनमानी कारभार सुरु केला असून टेंडर मॅनेज करणे कामात अनियमितता ठेवणे शहरात सुरु असलेल्या कामामध्ये लक्ष न देता आपली पोळी भाजून घेणे काम कसे का होत असेना आपले हाथ ओले जाहले बस यातच त्यांचे सर्व समाधान दिसून येत आहे. टेंडर मॅनेज करून आपल्या मार्जितल्या गुत्तेदार कडून आपला मोबदला घेणे धारूर शहरात झालेल्या आणि होत असलेल्या कामाची चौकशी केल्यास मोठ्या प्रमाणार वर भ्रष्टाचार दिसून येईल मुख्याधिकारी म्हणून ठाण मांडून बसलेल्या गायकवाड यांच्या काळात झालेली कामे मोठ्या प्रमाणात बोगस झाली असून प्रशासक आणि मुख्याधिकारी पद एकाच माणसाकडे असल्यामुळे त्याची मनमानी वाढली आहे. माननीय जिल्हा जिल्हाधिकारी साहेबांनी प्रशासकाचा कारभार उपजिल्हाधिकारी देऊन गायकवाड यांची मनमानी थांबवावी अशी मागणी माजी नगराध्यक्ष माधव तात्या निर्मळ यांनी केली आहे.

## पत्रकाराला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी

### माजलगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव मध्ये पत्रकार परमेश्वर चांदणे यांना त्यांच्या घरासमोर येऊन शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देण्यात आलेली आहे अशी तक्रार माजलगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेली आहे. दि.८/६ /२०२५ रोजी परमेश्वर हरिभाऊ चांदणे वय ४५ वर्ष राहणार देवखेडा तालुका माजलगाव जिल्हा बीड येथील रहिवासी असून मागील दहा ते पंधरा वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात काम करत आहेत व कुटुंबाची उपजीविका भागवत आहेत.

दि.८/६/२०२५ रोजी सकाळी ९:३० वाजण्याचे सुमारास परमेश्वर चांदणे व त्यांचे आई-वडील घरी असताना महादेव सखाराम वाघमारे, सुरेश पारखे, बबन सुरेश पारखे, अशोक सुरेश पारखे हे सर्व राहणार देवखेडा यांनी माझ्या घरासमोर येऊन काही एक कारण नसताना तू राहतोस ते घर खाली कर पसारा बाहेर काढ असे म्हणाले. मी म्हणालो की हे घर माझे आहे मी सामान काढत नाही असे म्हणताच सर्वांनी मिळून मला व माझ्या आईस शिवीगाळ करून तुम्ही पसारा घराबाहेर काढा असे म्हणून तू कशाचा पत्रकार आहेस तुझ्यासारखे माझ्याकडे भरपूर पत्रकार आहेत असे म्हणून तुला बघून घेऊत अशी धमकी दिली असे फिर्याद दार परमेश्वर चांदणे यांनी त्यांच्या फिर्यादीमध्ये म्हटले आहे.

यानुसार माजलगाव शहर पोलीस स्टेशन येथे संबंधित आरोपी विरुद्ध तक्रार दाखल झाली असून पुढील तपास माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस करत आहेत.

## महायुती सरकारच्या फसव्या योजना जनतेसमोर उघड करा : आ. कैलास पाटील

बीड । प्रतिनिधी



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कळंब धाराशिव चे आमदार मा. कैलास पाटील यांनी आज जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या संपर्क कार्यालयास भेट दिली. महायुती सरकारच्या निवडणुकी पूर्वी दिलेल्या फसव्या योजना, आश्वासने या विरोधात 'क्या हुवा तेरा वादा' या अनोख्या आंदोलना विषयी चर्चा केली.

महायुती सरकार स्थापने पूर्वी ज्या फसव्या योजना, आश्वासने जाहीर केली ती प्रखरतेने जनतेसमोर मांडा, गाव तांडा वस्ती वर जाऊन या सरकारचा खरा चेहरा जनतेला दाखवा असे आमदार कैलास पाटील म्हणाले. यावेळी त्यांनी शिवसैनिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांचा सत्कार जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केला, सोबत उपजिल्हाप्रमुख हनुमंत जगताप, राजु माहुवाले, सुशील पिंगळे, रवी वाघमारे, युवासेनेचे बबलु दिवे, नवनाथ प्रभाळे, प्रदीप कोटुळे, पंकज कुटे, गणेश लोणकर, सतीश परदेशी, मारुती वाघचौरे अक्षय काशीद, रंगनाथ पैठणकर, नंदकुमार घोगरे, विशाल तांबे सह आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १ रुपयाला मिळतो ९० रुपयांचा मोह; ओपन ते क्लोजपर्यंत पाहिली जाते वाट, लागते मात्र लावणाऱ्यांचीच वाट!

### केजमध्ये गैरकायदेशीर मटका व्यवसाय फोफावतोय खुलेआम

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यात मटक्याचा सट्टा हा सर्रास व खुलेआम चालणारा व्यवसाय बनला आहे. १ रुपयाला ८० रुपये मिळतात या आमिषाने तरुण पिढीला आकर्षित करून अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त केले आहेत. गावोगावी टपऱ्या, चहा गाड्या, हॉटेल, भाजी मंडई, अशा ठिकाणी मटक्याचे आकडे खुलेआम फिरताना दिसतात. ओपन ते क्लोजपर्यंत सट्टा लावणाऱ्यांची दिवसभर धावपळ सुरू असते. काही जण यातून पैसे कमवतात, पण अधिकतरांचे फसलेले भविष्य आणि कर्जबाजारी संसार मात्र कुणाच्याही लक्षात राहत नाहीत.

हे सर्व प्रकार 'बॉम्बे प्रिव्हेन्शन ऑफ गॅम्बलिंग क्ट, १८८७' (जुगार प्रतिबंधक कायदा १८८७) अंतर्गत बेकायदेशीर असून, त्यानुसार जुगार अड्डा चालवणे, जुगार खेळणे किंवा जुगारासाठी जागा उपलब्ध करून देणे हे गुन्हे आहेत.या कायद्यातील कलम ४ नुसार जुगार खेळताना आढळल्यास संबंधित व्यक्तीला जुर्माना व शिक्षेची तरतूद आहे. कलम ५ अंतर्गत ज्या ठिकाणी जुगार खेळवला जातो, त्या जागेचा मालक व चालक यांच्यावर देखील कारवाई करता येते. कलम १२ नुसार पोलीस अधिकार्यांना वारंटशिवाय संशयित जागेवर छापा टाकण्याचा अधिकार आहे.

पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे एवढा सट्टा उघडपणे सुरू असूनही पोलीस प्रशासनाकडून फारशी कारवाई होताना दिसत नाही. केवळ वरवरचे छापे व कारवाईचे ढोंग करून पुन्हा सट्टा सुरू होतो, असा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. तालुका पातळीवर सट्ट्याचे म्होरक्या, एजंट व स्थानिक गुन्हेगारी प्रवृत्ती यांच्यातील संगनमतामुळे हा सट्टा अधिकच बळावत आहे. त्यामुळे तरुणांना शिक्षण, रोजगाराच्या मार्गावरून भरकटवून हानिकारक प्रवृत्तीकडे वळवले जात आहे. या गंभीर परिस्थितीत पोलीस प्रशासनाने तत्काळ कारवाई करत मुख्य सूत्रधारांना अटक करावी, तसेच या गैरकायदेशीर सट्ट्यावर आळा घालण्यासाठी स्थायी गुप्तचर पथक कार्यरत करावे, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे. मात्र कायद्याचा बडगा केव्हा उगारणार, हे येणारा काळच ठरवेल तोपर्यंत मात्र अनेकांच्या स्वप्नांची राख होत राहणार का ? असा सवालही सर्वसामान्य नागरीकांत पडला आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT